Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 5 | Issue - 1 | Oct - 2015

# मुल्य आणि विद्यार्थी, शिक्षक भुमिका

**डॉ. कृष्णा पुंजाराम भदाणे**
**राजर्षी शाहू कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड) ताथवडे पुणे.**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.**

## प्रस्तावना:-




मानव हा समाजशील प्राणी आहे. प्राचीन काळापासून आजर्यत मानवी जीवनात मुल्यांना खुप महत्व आहे जसे महाभारतात श्रीकृष्णाने अर्जुनाला कर्म मुल्याचे महत्व शिकविले जसा काळ बदलत गेला तसे मुल्यातही बदल होतांना दिसत आहेत. आज मानव प्रगतीचा रथावर स्वार झाला आहे, परंतू तो मुल्य आपल्या व्यक्तिमत्वात व जीवनात रूजविण्यासाठी असमर्थ ठरत आहे जगाने विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगीक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. तरीही आज पाश्चिमात्य अमेरिका सारखा देश मुल्यांपासून वंचित आहे.

जगात अध्यात्मिक शांतता निर्माण करण्यासाठी शिक्षणाने मुल्य रूजविण्याचे काम हाथी घेतलेले आहे. शालेय अभ्यासक्रमात मुल्य शिक्षण विषय आला असूनही शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये मुल्य रुजविण्यासाठी असमर्थ ठरत आहेत. कारण इलेक्ट्रॉनिक माध्यमे यामध्ये टी. व्ही., इंटरनेट, मोबाईल, आकाशवाणी, गुगल, फेसबुक, ऑरकूट यासारख्या इलेक्ट्रॉनिक माध्यमातून शिक्षण मिळाले. परंतू ते शिक्षण मुल्य शिक्षण आहे का मुलांच्या -हास करणारे शिक्षण आहे याचा विचार करण्याची आजचा काळात गरज आहे. म्हणून संशोधन पेपर तयार करतांना संशोधनकाने मुल्य शिक्षण इलेक्ट्रॉनिक साधनाचा अध्ययनाव्दारे कसे देता येईल हा विषय निवडला आहे.

## इलेक्ट्रॉनिक साधनांव्दवारे मुल्य शिक्षण देण्याची गरज :-

इलेक्ट्रॉनिक साधनांव्दारे मुल्य शिक्षण शिक्षक आजच्या प्रगतशील राष्ट्रामध्ये देत आहे. आजही आपण मुल्य शिक्षण टी. व्ही, आकाशवानी वरील शैक्षणिक कार्यक्रमातून पाहत आहोत. आज समाज बदलत चालला आहे. व मुल्याची संकल्पनाच बदलत चालली आहे. व्यक्तीचे, समाजाचे, राष्ट्राचे मुल्य चदलत असल्यामुळे इलेक्ट्रॉनिक साधनादवारे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे मुल्याच्या -हास होऊ नये म्हणून शिक्षकाने इलेक्ट्रॉनिक साधणाद्वारे मु शिक्षण देणेचे गरजेचे आहे.

## मुल्य शिक्षण व्याख्या

**१ . हेन्री ज्युल्स :-** मुल्ये म्हणजे ज्याला आपण चांगले समजतो असे काहीतरी उदा. प्रेम, दयाळूपणा, समाधान, प्रामाणिकपणा सभ्यता, आराम व साधेपणा इ.

**२. राथस, हरमिन व सायमन :-** अनुभवातून वर्तनाबाबत मार्गदर्शन तत्वे प्राप्त होतात व त्या तत्वाद्वारे जीवनाला दिशा मिळते त्यास मुल्य म्हणतात.

वरील मुल्यांचा व्याख्येवरून मानवी जीवनात जे जे चागले आहे ते समाजासाठी, राष्ट्रासाठी उपयुक्त आहे. असे मानवी वर्तन म्हणजे मुल्य होय.

## इलेक्ट्रॉनिक साधनाद्वावारे मुल्यशिक्षणाचे महत्व :-

१. व्यक्तिमत्वाचा संपूर्ण विकासाठी मुल्यशिक्षण.

२. विद्यार्थ्यांचा वर्तनाला विशिष्ट दिशा देण्यासाठी मुल्यशिक्षण -

१. विद्यार्थ्यांमध्ये मुल्यांमुळे निर्णयक्षमता येते.

४. विद्यार्थ्यांमध्ये मुल्यांमुळे सहकार्य, प्रेम, शांती इत्यादी गुणांचा विकास होतो.

. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक मुल्यांचा विकास होतो.

९. विद्यार्थ्यांमध्ये मुल्यामुळे सुसंकृतपणा येतो.

७. विद्यार्थ्यांनामध्ये मुल्यामुळे स्वतः विषयी, समाजविषयी, मातृभूमीविषयी, जगाविषयी व जीवनाविषयी अभिरूची निर्माण होते.

## इलेक्ट्रॉनिक साधनाद्वावारे मुल्यशिक्षणाची गृहीतके :-

१. इलेक्ट्रॉनिक साधन टी.व्हीद्वारे विद्यार्थ्यांना चांगले व वाईट समजायला मदत होते.

२. इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे मुल्यशिक्षणाचा प्रभाव विद्यार्थामध्ये अधिक प्रमाणात होतो.

३. इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे मुल्यशिक्षण विद्यार्थी आत्मसात करतात.

४. इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे विद्यार्थी मुल्यशिक्षण जिवनात आचरणात आणतात -

. इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे, संगीत, नाट्य, अभिनय, स्पधेद्वारे विद्यार्थ्यांचे मनोरंजन होते व मुल्यशिक्षण मिळते.

## इलेक्ट्रॉनिक साधनाद्वावारे मुल्यशिक्षणाची उद्दिष्टे :-

१. स्वत: विषयी आत्मविश्वास निर्माण करण्यास मदत करणे.

२. इतराविषयी सहानुभूती निर्माण करण्यास मदत करणे,

३. देशावर व देशवासियांवर प्रेम करण्यास मदत करणे.

४. कुंटूब, देश व समाजाबाबत स्वताच्या जबाबदा-यांची जाणीव निर्माण होण्यास मदत करणे.

. विभिन्न जाती व धर्माविषयी आदर निर्माण होण्यास मदत करणे.

६. विद्यार्थ्यात नैतिक, सामाजिक, सौदर्यात्मक, मुल्यांचा विकास होण्यास मदत करणे.

७. विद्यार्थ्यांत चांगल्या नागरिकाचे गुण प्राप्त करण्यासाठी मदत करणे.

. विद्यार्थ्यांत लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, बंधुता, समानता इत्यादी मुल्यांसंबधी आदरभाव निर्माण करणे.

९. विद्यार्थ्यांना आनंद व मनोरंजनासाठी मदत करणे.

### मुल्याचे प्रकार :-

**१. मूलभूत सनातन अपरिवर्तनीय अंतिम मुल्ये :-** उदा सत्य, शिव, सौदर्य, न्याय, समता, स्वातंत्र्य इत्यादी.

**२. परीवर्तनीय विशिष्ट काळापुरती उपयुक्त मुल्ये:** उदा. कुटूंब पध्दत

**३. व्यक्तिगत मुल्ये व सामाजिक मुल्यः** उदा. व्यक्तिमर्यादीत, समता, स्वातंत्र्य, शिष्टाचार, सहनशीलता, इत्यादी

**४. आदर्श मुल्ये व वर्तनसंबंधी मुल्येः**सत्य, अहिसां, प्रेमदया ही आदर्शमुल्ये वर्त संबंधी स्थलसापेक्ष व कालसापेक्ष असतात .

**. आंतरिक मुल्ये व बाह्य मुल्ये :-**

**आंतरिक मुल्ये**. समाधानावर आधारीत असतात.

**बाहय मुल्ये :-** सामाजिक व्यवहारावर आधारीत असतात.

- **एन.सी.इ.आर.टी ने Documents on social moral spiritual values in Education चा पुस्तकात खालील मुल्ये सांगितली आहेत :-**

१. इतरांच्या सांस्कृतिक मुल्यांची जाण २. अस्पृश्यता न मानणे ३. नागरिकत्वाचे पालन ४. सहकार्य . ग्वच्छता ६. लोकशाहीवर विश्वास ७. व्यक्तीसन्मान . कर्तव्यपरायणता ९. शिस्त १०. सहनशीलता ११ प्रामाणीकपणा १२. शिष्टाचार १३. कृतज्ञता १४ मदतशीलता १५. मानवता १६. पुढाकार १७. न्यायप्रियता १८. प्रामाणिकपणा १९ पशुप्रेम २०. अहिंसा २१. शांतिप्रियता २२. देशप्रेम २३. आत्मनिर्भरता २४. स्व-नियंत्रण २५. सत्यप्रियता २६. समाजसेवा २७. समाजवाद.

### इलेक्ट्रॉनिक साधनांद्वावारे विद्यार्थ्यांना मुल्यशिक्षण देण्यासाठी शिक्षकाची भूमिका:-

१. समाजसेवा, बालवीरपथक शाळेत व महाविद्यालयात राबविणे.

२. शाळा व महाविद्यालयामध्ये विविध अभ्यासपुरक कार्यकमाचा उपयोग मुल्यशिक्षणासाठी करणे.

३. शाळामध्ये नैतिक शिक्षणासाठी भक्तीगीते, विविध धर्माचा प्रार्थना, कथा, यांचे आयोजन करणे.

४. शाळा व महाविद्यालयामध्ये थोर माणसांची चरित्रे, विविधसन व दिवस साजरे करणे.

. शाळांमध्ये सामाजिक प्रश्नासंबंधी चर्चा व भाषणे आयोजित करणे.

६. नृत्य, संगीत, चित्रकला, ललितकलांच्या माध्यमातून सांरकृतील कार्यकम शाळा व महाविद्यालयामध्ये आयोजित करणे.

७. विद्यार्थ्यांमध्ये नागरिकत्वाचा मुल्ये रूजविण्यासाठी एम.सी.सी, ए.सी.सी , समाजसेवा, कार्यक्रमाचे आयोजन करणे.

. शाळा व महाविद्यालयातील अभ्यासक्रमात मुल्यशिक्षण विषयाचा सामावेश करणे.

९. शिक्षकाने अध्यापन करतांना इलेक्ट्रॉनिक साधनाद्वावारे घटकाचा व जीवणाचा संदर्भ जोडणे व मुल्यशिक्षण देणे.

१०. विद्यार्थ्यांना प्रसारमाध्यमे व वर्तमानपत्रातील वाईटगोष्टी पासून परावृत्त करणे. व चांगली मुल्य शिकविणे.

११. दुरदर्शन व टि.व्हीद्वारे दाखविल्या जाणा-या कार्यक्रमातून विद्यार्थ्यामध्ये चांगली मुल्याची रूजवणूक करते.

१२. शाळांमध्ये बालकांचा मुल्याधिष्ठित वर्तनाचे मुल्यमापण करणे.

१३. शाळामध्ये भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, सामाजाला घातक गोष्टी, यांचे प्रबोधन करण्यासाठी पथनाट्यद्वारे सादरीकरण करणे व चांगली मुल्ये समाजात रूजवणे

१४. इलेक्ट्रनिक साधनाद्वारे समाजपरिवर्तन करण्यासाठी मुल्यावर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन करणे.

१५. इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे बातम्या, वर्तमानपत्रे, याद्वावारे चांगल्या कामाबदल प्रोत्साहन व बक्षिसाचे आयोजन करून मुल्याची रूजवणूक करणे.

## संदर्भ :-

१. दुनाखे अरविंद(२००७), "उदयोन्मुख भारतातील समाज शिक्षण व शिक्षक", नुतन प्रकाशन पुणे. पृष्ठ, ३३१, ३३२.
२. करंदीकर सुरेश (२००७), उदयोन्मुख भारतातील समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन कोल्हापूर.